MHNS130006522018 रे.मु.क्र.६०/२०१८

मधुकर वि.स.ुनिल

निशाणी क्र.२४ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत अर्जास नि.क्र.३२ वर लेखी म्हणणे दिले. अर्ज व म्हणणे वाचले. वादीचे कथन की, दाव्यात प्रतिवादी यांचे आई व बहिण यांना सामील करण्याचे अनावधानाने राहून गेलेले आहे. दाव्यात ते न्याय पक्षकार आहेत. त्यांच्या अभावी दाव्याचा गुणवत्तेवर निकाल होवू शकत नाही. तसेच दावा दाखल झाल्यानंतर काही घटना घडल्याने त्या घटना दाव्यात नमूद करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादींनी प्रतिवादी यांची आई व बहिण यांना दाव्यात सामील करुन दाव्यासंबंधी दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घटना दाव्यात दुरुस्ती अर्जाद्वारे नमूद करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी हरकत घेतली असून अर्जातील संपूर्ण मजकूर नकारलेला आहे. प्रतिवादीचे कथन की, अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी म्हणून प्रतिवादीची आई व बहिण यांना सामील करण्यासाठी कोणतेही कारण घडलेले नाही. दाव्यात प्रतिवादीची आई व बहिण यांच्याबाबत कथन नाही. प्रतिवादीचे पुढे कथन की, दुरुस्तीच्या अर्जाला कोणतेही कारण घडलेले नाही व वादी रस्त्याबाबत नव्याने दुरुस्ती करु पाहत आहे. त्यांचे कथन की, अर्जात नमूद केलेला रस्ता हा फक्त प्रतिवादी यांच्या वापराचा रस्ता आहे व प्रतिवादी या दाव्याच्याकामी प्रतिदावा दाखल केल्यानंतर व प्रतिदाव्यास दि.२०.१०.२०१८ रोजी वादीने उलट कैफियत दिल्यानंतर प्रस्तुतचा खोटा दुरुस्ती अर्ज दाखल केलेला आहे.

५. युक्तिवाद ऐकला. अभिलेख, दाखल कागदपत्रे व नियोजित दुरुस्तीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच आपले कथन सिध्द करण्याची संपूर्ण

जबाबदारी वादीची असल्याकारणाने, सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच झालेला विलंब व गैरसोय यांची भरपाई केली जावू शकते. प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे;

**आ दे श**

**१.** निशाणी क्र.२४ वरील अर्ज रक्कम रुपये ५००/— खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

**२.** खर्चाची रक्कम रुपये ५००/— वादीने तालुका सेवा प्राधिकरण यांच्याकडे जमा करावी. त्यानंतर वादीने प्रस्तावीत दावा दुरूस्ती करून दुरूस्त दाव्याची प्रत १४ दिवसांच्या आत दाखल करावी.

स्वाक्षरी /—XXX
**( व. वा. खेंदाड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पिंपळगाव(ब)

दिनांक :— १८/०४/२०२६.
ठिकाण :— पिंपळगाव(ब)